## प्रकरण तीन

# संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा आढावा.

# प्रकरण तिसरे - संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचा आढावा.


३.१ प्रस्तावना

३.२ संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे समालोचन

३.२.१ संशोधन समस्येशी निगडित ग्रंथ व लेख स्वरुपातील प्रकाशित झालेल्या साहित्याचा मागोवा.

३.२.२ संशोधन समस्येशी निगडित असलेल्या संशोधित साहित्याचा मागोवा.

३.३ समारोप

## 3.१ प्रस्तावना

मागील प्रकरणात (प्रकरण क्रमांक २ - अनुबंध कसोटी) अनुबंध चाचणीची वैशिष्टये, अनुबंध चाचणीचे सुरुवातीचे कार्य, पध्दती, रिक्त स्थानाची निश्चिती करणे, गुणदान योजना, अनुबंध चाचणीचा विकास यांचे विवेचन केले आहे. प्रस्तुत प्रकरणात संशोधनाशी निवडलेल्या विषयाशी संबंधित साहित्याचा अभ्यास केलेला आहे.

संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचा मागोवा घेणे महत्वाचे आहे. त्यामुळे संशोधकाला तुलनात्मक माहिती, उचित संशोधन पध्दती आणि संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित कल्पना येते. Prof. Whithney आपल्या "The Elements of Research" या ग्रंथात म्हणतात,

"The student should find analyze and evaluate critically every pertinent Research report dealing with his chosen problem. Anything less than this will be neither sensible nor scientific.

The review of the literature promotes a greater understanding of the problem and its crucial aspects and ensures the avoidance of unnecessary duplication. It also provides comparative data on the basis of which to evaluate and interprete the significance of one's findings. In addition, it contributes to the Scholarship of the investigator. No experienced researcher would think of undertaking himself with the contribution of previous investigators."[१]

पूर्वी झालेल्या संशोधन साहित्याचा अभ्यास करण्याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे[२]

१) निवडलेल्या विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करुन त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळविणे.

२) निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य पध्दती, तंत्र यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

३) संशोधन विषयासंबंधी सिध्दांत व गृहीत कृत्य यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना प्राप्त करुन घेणे.

४) आधारसामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे. समर्पक सांख्यिकी तंत्र व त्याचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

७) संदर्भ साहित्याचा अभ्यास करुन स्वतःची ज्ञानवत्ता वाढविणे.

## ३.२ संशोधन समस्येशी निगडित संशोधित साहित्याचा मागोवा

संशोधन समस्येशी निगडित साहित्य दोन प्रकारचे आहे.

१) ग्रंथ स्वरुपात प्रकाशित झालेले सैध्दांतिक व माहितीवजा स्वरुपाचे साहित्य.

२) संशोधन पदवीसाठी विद्यापीठांतून सादर केले गेलेले शोधप्रबंधाच्या स्वरुपातील साहित्य.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम ग्रंथ स्वरुपात व लेख स्वरुपात प्रकाशित झालेल्या साहित्याचा मागोवा घेण्यात आला आहे.

### ३.२.१ संशोधन समस्येशी निगडीत ग्रंथ व लेख स्वरुपातील प्रकाशित झालेल्या साहित्याचा मागोवा.

**1) An Experiment with Cloze Testing RAPHAEL GEFEN, 1979.**

वरील लेखामध्ये अनुबंध कसोटीची गरज विशद केलेली आहे. तसेच त्यांनी प्रयोगही करुन निष्कर्ष काढले आहेत. या प्रयोगासाठी ४० शाळांमधील ९० वर्गांसाठी अनुबंध कसोटी तयार केली. दोन पाठ्यपुस्तकातून दोन वेगवेगळे उतारे निवडले. पहिल्या उताऱ्यातील

प्रत्येकी ७ वा शब्द गाळला व दुसऱ्या उताऱ्यातील शब्द पहिल्या उताऱ्याइतकेच गाळले. परंतु ते एका ठराविक क्रमानेच न गाळता परीक्षकांच्या इच्छेनुसार गाळले. हे दोन्ही उतारे प्रत्येक विद्यार्थ्यांना भरण्यासाठी दिले. ४० पैकी ३८ शाळांची पसंती ही परीक्षकांच्या इच्छेनुसार गाळलेल्या उताऱ्याला होती. ही या संशोधनाची कार्यपध्दती होती.

**निष्कर्ष -**

या अनुबंध कसोटीची यशस्वीयता विचारात घेऊन ईस्त्रायल सरकारने मॅट्रिक्युलेशन परीक्षेसाठी या पध्दतीचा स्वीकार केला.

**2) Cloze Testing of Second Language Learners - H. Waiman - 1979**

यांनी आपल्या लेखात अनुबंध कसोटी म्हणजे काय? याचे सविस्तर वर्णन केले आहे. तसेच पारंपारीक परीक्षा पध्दतीच्या संदर्भात अनुबंध कसोटीचे महत्त्व विशद केलेले आहे.

**कार्यपध्दती -**

यांनी आपल्या संशोधनासाठी प्रायोगिक पध्दती वापरली आहे. सदर कसोटीसाठी ११४२ शब्द असलेला दीर्घ उतारा निवडला. प्रस्तुत उताऱ्याचे दोन भाग केले. पहिल्या भागातील परीक्षकाच्या पसंतीनुसार ४० आशय शब्द गाळणे. दुसऱ्या भागातील प्रत्येकी १० वा शब्द गाळला. हे शब्दही ४० असून त्यापैकी २० आशय शब्द व २० रचना शब्द आले. माध्यमिक शाळातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचे ७ वर्ग निवडले. या पदवीपूर्व विद्यार्थ्यांचा एक गट अशा एकूण २०७ विद्यार्थ्यांना हा उतारा भरण्यासाठी देण्यात आला. प्रस्तुत उतारा तपासणाऱ्या परीक्षकांना आदर्श उत्तरपत्रिका देण्यात आली. अचूक शब्दाबरोबरच अर्थ ध्वनित होणाऱ्या शब्दांनाही गुण देण्यास सांगण्यात आले.

निष्कर्ष -

१) प्रस्तुत संशोधनातून असे स्पष्ट होते की, प्रत्येक १० वा शब्द गाळलेला उतारा आणि कोणताही शब्द गाळलेला उतारा या दोहोंचे परिणाम सारखेच दिसून येतात.

२) विद्यार्थ्यांच्या लेखन व वाचन कौशल्याबाबतची शिक्षकांची मते ही अनुबंध कसोटीतील निकालाशी मिळती-जुळती आहेत.

३) इंग्रजी ही द्वितीय भाषा म्हणून शिकणाऱ्यांना इंग्रजी ही प्रथम भाषा म्हणून शिकणाऱ्यांपेक्षा जास्त अडचणी आल्या.

**3) The Cloze Test as a measure of Language Proficiency for India - Dr. S. V. SHASTRI, 1980**

यांनी आपल्या लेखात प्रस्तावना सविस्तरपणे दिलेली आहे. भारतीय शिक्षकांना अनुबंध कसोटीशी परिचित करणे हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे. जी कसोटी २० वर्षापासून इंग्रजी द्वितीय भाषा म्हणून शिकणाऱ्यांकरिता सर्व भाषिक कौशल्ये तपासण्याचे एक साधन म्हणून सर्वत्र वापरली जाते. तसेच त्यांनी आपल्या लेखात अनुबंध कसोटीचा इतिहास व उपयोग, अनुबंध कसोटीची रचना व गुणदान योजना याविषयी विवेचन केलेले आहे.

**4) Testing Overall Language Ability - The Cloze Procedure ELTC - 1988**

या लेखात वेगळी मुद्दा चाचणी तंत्र, अनुबंध चाचणीची वैशिष्ट्ये, अनुबंध चाचणीचे सुरुवातीचे कार्य, पध्दती, रिक्त स्थानाची निश्चिती करणे, उताऱ्याची काठिण्य पातळी, गुणदान योजना, विकास इत्यादी बाबींचा सविस्तर विचार केलेला आहे.

## ३.२.२ संशोधन समस्येशी निगडित असलेल्या संशोधित साहित्याचा मागोवा

वरील परिच्छेदांतून ग्रंथरुपाने तसेच लेख रुपाने प्रकाशित झालेल्या साहित्याचा मागोवा घेतला. पुढील परिच्छेदांतून संशोधन समस्येशी संबंधित असलेल्या संशोधित साहित्याचा मागोवा घेण्यात आला आहे.

प्रस्तुत विषयाशी संबंधित संशोधनाच्या अभ्यासाचा शोध घेण्यासाठी संशोधिकेने पुढील ग्रंथांचे अवलोकन केले.

1) Educational Investigation in Universities (1939-1961), N.C.E.R.T., New Delhi - 1963.

2) The Third Indian Year Book of Educational Research, N.C.E.R.T., New Delhi - 1969

3) Education Investigation In Universities In Maharashtra (1939-1970) State Institute Of Education, Pune- 30, 1972.

4) The Second Survey of Research In Education, (1972-78) Editor Dr.M.B.Buch, Society for Educational Research and Development, Baroda 1979.

5) Educational Research In The University of Bombay, Editor Dr. (Mrs.) Pratima Deo, Department of Education, University of Bombay 1981.

6) Educational Research in Universities in Maharashtra, Platinum Jubilee Year Volume, Editor Dr.N.K.Patole, S.T.College, Bombay (Mumbai) 1983.

7) The Survey of Research in Education, Editor Dr.M.B.Buch, Centre of Advance Study in Education, The N.S. University, Baroda, 1984.

8) Third Survey of Research in Education (1978-1983) Editor Dr.M.B.Buch, National Council of Education Research & Training 1987.

9) Abstracts of Doctoral Researches in Education Editor Dr.M.B.Pandey, Dr.M.B.Kundle, Nagpur, Secretary,Shikshan Sameeksha Mandal - 1987.

10) The International Encyclopedia of Educational Research & Studies, Vol. IX (New Delhi N.C.E.R.T.) 1991.

11) Fifth All India Educational Survey, Vol. I, II New Delhi N.C.E.R.T.) 1992.

वरील ग्रंथांव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यावतीने प्रसिध्द होणारे "रिसर्च बुलेटीन" या त्रैमासिकाचे सर्व अंक त्याचप्रमाणे असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज् यांच्यावतीने प्रकाशित होणाऱ्या "युनिव्हर्सिटी न्यूज" या साप्ताहिकातील "थिसीस ऑफ दि मंथ" या सदराखाली प्रसिध्द होणाऱ्या विद्यापीठांनी स्वीकृत केलेल्या प्रबंधांची पाने चाळली.

वरील ग्रंथाचे काळजीपूर्वक अवलोकन करुन प्रस्तुत संशोधनाशी संबंधित जे संशोधन झालेले आहे त्याचा आढावा पुढील परिच्छेदातून घेतलेला आहे. प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित असे संशोधन अद्यापी झाले नसल्याचे आढळून येते म्हणून या विषयाचे संशोधन नाविन्यपूर्ण आहे असे म्हणता येईल. परंतु अनुबंध कसोटीच्या संदर्भात झालेल्या व प्रस्तुत संशोधन विषयाशी थोड्याफार प्रमाणात संबंधित असणाऱ्या काही संशोधनाचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. संबंधित संशोधन अहवालाची उद्दिष्टे, कार्यपध्दती, निष्कर्ष व शिफारशी थोडक्यात पुढे दिलेल्या आहेत.

**I) "The effect of varying 'N' In cloze procedure."**

**By - Suvarna K.Sawant**

हा संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठात इंग्रजी विषयातील एम्.फिल. या पदवीसाठी कु.सावंत एस.के. यांनी डॉ.शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली इ.स.१९८९ मध्ये पूर्ण केला.

**उद्दिष्टे :-**

ओलरच्या मते बदलत्या रिक्त स्थानाचा कृतीवर कोणताही परिणाम होत नाही. हा निष्कर्ष तपासणीसाठी ७ ते १२ पर्यन्तच्या बदलत्या गाळांतराच्या संदर्भात ओलरचे निष्कर्ष तपासणे हा प्रसतुत संशोधनाचा हेतू होता.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पध्दती वापरण्यात आली आहे. सदर प्रयोगासाठी एस.एन.डी.टी. विद्यापीठातील प्रथम वर्षाच्या क्रमिक पुस्तकातील शिकविलेला उतारा अनुबंध कसोटीसाठी निवडला. उता-याची निवड करताना विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता व उता-याची काठिण्यपातळी यावर विशेष लक्ष दिले. उता-याची लांबी ९०० शब्दांची होती. उता-यातील प्रत्येक पाचवा, सातवा, नववा व अकरावा असा गाळांतराचा क्रम सदर प्रयोगासाठी निवडला. पहिले आणि शेवटचे वाक्य तसेच ठेवण्यात आले. ही कसोटी पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अशा दोन विद्यार्थी गटांना देण्यात आली. पदवीपूर्व गटासाठी कमला कॉलेजमधील वाणिज्य शाखेकडील द्वितिय वर्षाचे ४८ विद्यार्थी निवडले. पदव्युत्तर गटासाठी शिवाजी विद्यापीठातील एम.ए.प्रथम वर्षाचे इंग्रजी विषयाचे ४८ विद्यार्थी निवडले. पदवीपूर्व गटातील ४८ विद्यार्थ्यांचे १२ चा एक असे चार समान गट करुन या ४ गटांना ४ अनुबंध कसोटया देण्यात आल्या. पदव्युत्तर गटासाठीही वरीलप्रमाणेच कृती केली गेली.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत संशोधनात सादर केलेल्या मर्यादीत साहित्यातून असे दिसून येते की, संवेदनक्षम अनुबंध कसोटीचे अनुभवाधारीत निष्कर्षाच्या सभोवतालच्या साहित्याच्या संदर्भात सामान्यीकरण करता येत नाही. त्यामुळे अनुबंध कसोटीची संवेदनक्षमता ही त्या क्रमिक पुस्तकातच आढळते. त्यामुळे असे गृहित धरले जाते की, अनुबंध कसोटी आणि

13355
A

अनुबंध घटक यांची काठिण्य पातळी क्रमिक पुस्तकावर अवलंबून आहे. सदर बाबतीत अजूनही अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

**II) "Cloze Technique As An Instrument In Determing The Authenticity of Teaching Materials."**

हा संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठांतर्गत इंग्रजी विषयातील एम्.फिल्. या पदवीसाठी कु. पाटील प्रभावती ए. यांनी डॉ. शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली १९९३ मध्ये पूर्ण केला.

**उद्दिष्टे -**

इंग्रजी भाषा अध्यापनासाठी मुद्दामहून बनविलेल्या सामग्रीची नैसर्गिकता कितपत आहे हे ठरविण्यासाठी अनुबंध तंत्राच्या उपयोगाची शक्यता कितपत आहे हे तपासणे.

**गृहितके -**

१) मूळ भाषिकाला त्याच्या मूळ मातृभाषेविषयी उपजत ज्ञान असते. त्या ज्ञानामुळे तो माणूस बाह्यघटकाची नैसर्गिकता अथवा अनैसर्गिकता याविषयी मूल्य विधान करु शकतो असे गृहित धरले आहे.

२) हे तपासण्यासाठी ज्याची मातृभाषा इंग्रजी आहे अशा व्यक्तींना एखादा पाठयभाग देऊन त्या विषयीचे त्यांचे मत जाणून घेणे हा पर्याय संशोधिकेसमोर होता. हा पर्याय Open ended झाला असता तर त्यातून निश्चित निष्कर्ष आले नसते म्हणून या मूळ भाषिकांच्या प्रतिसादांवर मर्यादा घालावी लागली.

**संशोधन पध्दती -**

महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने इंग्रजी द्वितीय भाषा म्हणून रचनात्मक दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून ७ वी ते १० वी च्या सद्याच्या उपयोगातील जी पाठ्यपुस्तक तयार केली आहेत. त्यातील ९ वी च्या पाठ्यपुस्तकातील "विक्रमादित्याचे न्यायासन" ही ११०० शब्दांची कथा निवडली. when, while, afraid that, sure that, certain that हे घटक

निवडली. when, while, afraid that, sure that, certain that हे घटक शिकविण्यासाठी कथा निवडली. कथेतील पहिला परिच्छेद तसाच ठेवला. प्रत्येकी पाचवा शब्द वगळला. त्यामुळे १७४ रिकाम्या जागा झाल्या. त्यातील ८७ आशय शब्द व ८९ रचना शब्द होते. हा उतारा इंग्रजी मातृभाषा असणाऱ्या तज्ञांकडून भरुन घेतला. पथदर्शी अभ्यासासाठी तीन माहितगार भारतीयांकडून उतारा भरुन घेतला.

**निष्कर्ष -**

ज्या पाठ्यभागावर संशोधन केले त्याची वैशिष्ट्ये पूर्वी म्हटल्याप्रमाणे एखादया मूळ पुस्तकाची वैशिष्ट्ये ही मुद्दाम तयार केलेल्या सामग्रीपेक्षा वेगळी काय असतात याचे विधान कोणीही केलेले नाही. मातृभाषिकाची भाषा आणि भारतीय लेखकाने तयार केलेली भाषा या दोघांच्या भाषिक क्षमतेत कोणता फरक असतो हे शोधण्याचा प्रयत्न केला.

अ) मूळ भाषिक तज्ज्ञाच्या पृथक्करणात असे दिसून आले की, मूळ भाषिक माणूस जे आशय शब्द वापरतो त्यापेक्षा भारतीय तज्ज्ञ वेगळे आशय शब्द वापरतो. यांच्यात फार फरक असलेला दिसतो. २६% शब्द हे भारतीय भाषिक तज्ज्ञासारखे होते. उरलेले २४% समानार्थी शब्द तर ५०% शब्द हे वेगळया शब्दात तोच आशय असलेले असे दिसून आले.

ब) रचना शब्दांच्या बाबतीत मात्र ६४% प्रतिसाद हे अगदी बरोबर आहेत. पण व्याकरणाच्या वर्गातील पर्यायी प्रतिसाद मात्र फारच विचित्र होते. मूळ भाषिकांनी कथाकाराच्या दृष्टिकोनातून रिकाम्या शब्दांना प्रतिसाद दिलेले आहेत.

क) मूळ शब्दांपेक्षा वेगळ्या शब्दात आशय शब्दांना प्रतिसाद देण्याचे प्रमाण जास्त तसेच त्यात वैविध्यही जास्त होते. यातून काही वैशिष्ट्ये लक्षात आली.

i) काही वेळेला मूळ पाठ्यपुस्तक हे काही घटकांच्या पुनरावृत्तीमुळे एकसुरी झालेले होते. उदा. Cowboy हा शब्द अनेक वेळा आला. आणि मूळ भाषिकांनी त्याला प्रत्येक वेळी वेगवेगळा प्रतिसाद देण्याचा प्रयत्न केला आहे.

ii) कथेतील काही संकल्पना संस्कृती संदर्भ असल्याने, बोली भाषेतील असल्याने पुस्तक लिहिणाऱ्यांनाच ती एक समस्या बनली आहे.

iii) Wonder struck, Throbbing अशा काही शब्दांचा पाठ्यभागातील उपयोग मूळ भाषिकाला ओळखता आला नाही याचा अर्थ असा होतो की, पाठ्यपुस्तक लिहिणारी माणसे ही काही घटकांची अनैसर्गिकरित्या निवड करतात असे दिसून आले.

iv) Sure & Certain ही खूप लांबलांब आली होती. त्याचा वापर मूळ भाषिकांनी मूळ पाठ्यभागानुसारच केला.

v) कथेतील पात्रांच्या दृष्टीकोनातून मूळ भाषिकांनी शब्द रचना वापरले. परंतु, पुस्तक लिहिणाऱ्यांनी (रचना) शब्दांच्या वापराकडे तटस्थपणे पाहिलेले दिसते.

vi) when & while हे शब्द भरताना मूळ भाषिकांनी फरक केलेला होता. परंतु, पुस्तक लिहिणाऱ्यांना हा फरक कळलेला नाही किंवा त्यांनी तो गरजेचा समजलेला नाही.

vii) मूळ भाषिकांनी आशय शब्दाच्या ठिकाणी रचना शब्द व रचना शब्दाच्या ठिकाणी आशय शब्द अर्थ न बदलता वापरलेला आहे.

मुद्दामहून तयार केलेल्या सामग्रीत खालील वैशिष्ट्ये आढळून येण्याचा संभव आहे.

आशय व रचना शब्दांची पुनरावृत्ती ज्यामुळे पाठ्यभाग हा एकसुरी बनतो.

विशेषतः क्रियापद आणि नाम यांच्या मूळ इंग्रजीत शक्यतो न वापरल्या जाणाऱ्या रचना या पुस्तकात वापरलेल्या आढळतात.

विशेषतः क्रियापद आणि नाम यांच्या मूळ इंग्रजीत शक्यतो न वापरल्या जाणाऱ्या रचना या पुस्तकात वापरलेल्या आढळतात.

तटस्थ अशा आशय शब्दांची व रचना शब्दांची या पुस्तकात केलेली आढळते. त्यामुळे खात्रीलायक अर्थ त्यातून ध्वनित होत नाही. याचे कारण लेखकाच्या भाषेमधील रस मुलांना रंजक कथा सांगणे नसून भाषा शिकविण्यामध्ये असू शकेल. त्यामुळे मूळ इंग्रजी भाषिकांच्या दृष्टिकोनातून हा घटक अस्वीकारणीय असा झालेला आहे.

**III) "A battery of Cloze Tests For Colleges Enterence."**

हा संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठात इंग्रजी विषयातील पी.एच्.डी. या पदवीसाठी श्रीमती एस्. व्ही. कुलकर्णी यांनी १९९६ मध्ये पूर्ण केला.

**उद्दिष्टे -**

१. मूल्यमापनाचे विश्वसनीय साधन म्हणून अनुबंध कसोटीची विश्वसनीयता तपासणे हा सदर संशोधनाचा उद्देश आहे.

२. सध्या अस्तित्वात असलेल्या अंतर्गत व बहिर्गत परीक्षेच्या मूल्यमापन साधनांशी अनुबंध कसोटीची तुलना करणे हाही उद्देश आहे.

त्यासाठी प्रमाणित केलेल्या अनुबंध कसोटया तयार करणे गरजेचे आहे. सदर कसोटीद्वारा प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचे भाषा कौशल्य तपासता येईल.

**संशोधन पध्दती -**

या संशोधनासाठी प्रायोगिक पध्दती वापरली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी सोलापूर शहरातील प्रथम वर्षातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमधून एकूण १७७ विद्यार्थ्यांचा नमुना गट निवडला. प्रत्येक रविवारी एक याप्रमाणे चार अनुबंध कसोटचा विद्यार्थ्याला देण्यात आल्या. प्रत्येकाची अनुबंध कसोटी भिन्न-भिन्न होती. सामान्यपणे उतारा सोडविण्यासाठी अर्धा तास वेळ दिला गेला.

**निष्कर्ष -**

१) अनुबंध कसोटी हे विश्वसनीय, वैज्ञानिक, प्रशासनास व मूल्यमापनास सोपे साधन असून त्याद्वारे इंग्रजी या द्वितीय भाषेची वाचनक्षमता आणि संपूर्ण भाषा कुशलता तपासता येते.

२) अनुबंध कसोटीद्वारा हुशार व तज्ज्ञ शिक्षक आणि शिक्षण तज्ज्ञांकरिता एक नवे दालन खुले झाले आहे.

३) "शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पध्दतीच्या निवडीसाठी अनुबंध कसोटीची उपयुक्तता पडताळून सप्रमाणता सिध्द करणे."

हा संशोधन प्रकल्प शिवाजी विद्यापीठांमध्ये डिसेंबर १९९७ साली सौ.पाटील लता शिवाजी यांनी शिक्षणशास्त्र विषयातील एम्. फिल्. पदवीसाठी सादर केला.

**या संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टे -**

१) दुसरी अध्यापन पध्दती म्हणून मराठी अध्यापन पध्दतीची निवड करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी त्या अध्यापन पध्दतीच्या प्रवेशासाठी कसोटी तयार करणे.

२) ह्या तयार केलेल्या अनुबंध कसोटीची उपयुक्तता पडताळून पाहणे.

३) ह्या अनुबंध कसोटीची सप्रमाणता पडताळून पाहणे.

**संशोधन पध्दती -**

सदरच्या संशोधिकेने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला होता. सामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखती, अनुबंध कसोटीचा उतारा यांचा वापर केला होता. टी मूल्य व ॲनोवा या सांख्यिकी परिमाणांचा उपयोग करुन विश्लेषण व अर्थनिर्वचन केले.

**निष्कर्ष व शिफारशी -**

१) पदव्युत्तर परीक्षेसाठी मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे व पदव्युत्तर परीक्षेसाठी इतर भाषा विषय (इंग्रजी, हिन्दी) घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राविण्य सारखेच आहे. म्हणजेच पदव्युत्तर परीक्षेला इतर भाषा विषय (इंग्रजी, हिन्दी) घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी.एड्. ला मराठी अध्यापन पध्दती देणेस हरकत नाही. त्यासाठी त्यांना अनुबंध कसोटी देण्याची आवश्यकता नाही.

२) पदव्युत्तर परीक्षेला मराठी व इतर सामाजिक शास्त्रे (इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र व गृहशास्त्र) घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अनुबंध कसोटीतील प्राविण्यामध्ये आलेला फरक हा लक्षणीय सार्थ (Highly Significant) आहे. म्हणून पदव्युत्तर परीक्षेला सामाजिक शास्त्रे घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मराठी अध्यापन पध्दती देण्याअगोदर त्यांचे मराठी भाषेतील प्राविण्य पडताळण्यासाठी त्यांना अनुबंध कसोटी दिली जावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

३) पदव्युत्तर परीक्षेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या व पदव्युत्तर परीक्षेला समाजशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राविण्य सारखेच आहे. म्हणून या विद्यार्थ्यांना मराठी अध्यापन पध्दती देणेस हरकत नाही. त्यांना अनुबंध कसोटी देणेची आवश्यकता नाही. तथापि, पदव्युत्तर परीक्षेला समाजशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झालेला केवळ एकच विद्यार्थी आहे. म्हणून या विद्यार्थ्याला मराठी अध्यापन पध्दती देणेस हरकत नाही असे विधान करणे धाडसाचे होईल. सबब, पदव्युत्तर परीक्षेला समाजशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मराठी अध्यापन पध्दती देतेवेळी अनुबंध कसोटी दिली जावी.

४) पदव्युत्तर परीक्षेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या व पदव्युत्तर परीक्षा वाणिज्य शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अनुबंध कसोटीतील प्राविण्यातील फरक लक्षणीय सार्थ (Highly Significant) आहे.

म्हणून त्यांना मराठी अध्यापन पध्दती घेऊ दिली जाऊ नये. जर त्यांना मराठी अध्यापन पध्दती दयावयाची असेल तर अनुबंध कसोटी देणे अत्यंत आवश्यक आहे.

५) पदवी परीक्षेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या व पदवी परीक्षेला हिंदी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राविण्यासारखेच आहे. म्हणजेच या विद्यार्थ्यांना मराठी अध्यापन पध्दती घेऊ दिली जावी. त्यांना अनुबंध कसोटी देण्याची आवश्यकता नाही.

६) पदवी परीक्षेला मराठी व इतर सामाजिक शास्त्रे (इतिहास, भूगोल, मानसशास्त्र) घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अनुबंध कसोटीतील प्राविण्यामधील फरक लक्षणीय सार्थ आहे म्हणून या विद्यार्थ्यांला मराठी अध्यापन पध्दती घेऊ दिली जाऊ नये. संशोधिका या ठिकाणी अशी शिफारस करते की, इतिहास, भूगोल, मानसशास्त्र हे विषय घेऊन पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मराठी अध्यापन पध्दती देणे. अगोदर त्यांना अनुबंध कसोटी देऊन त्यांचे मराठीतील प्राविण्य पडताळावे.

७) वाणिज्य शाखेतून पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मराठी अध्यापन पध्दती देतेवेळी अनुबंध कसोटी दिली जावी.

## 3.3 समारोप

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाच्या संबंधित संशोधित साहित्याचा आढावा घेतल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट होते की, अद्यापि प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित स्वरुपाचे संशोधन अद्यापि झालेले नाही. म्हणून या विषयाचे संशोधन मूलभूत स्वरुपाचे व नाविन्यपूर्ण आहे असे म्हणता येईल. इंग्रजी विषयाच्या बाबतीत मात्र शिवाजी विद्यापीठांतून फारच थोड्या प्रमाणात संशोधन झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने एस्.के.सावंत, पी.ए.पाटील, एस्.व्ही.कुलकर्णी यांच्या संशोधनाचा ऊहापोह केलेला आहे.

संशोधन समस्येशी संबंधित प्रकाशित, अप्रकाशित आणि संशोधित साहित्याचा मागोवा घेतल्यानंतर पुढील प्रकरणात (प्रकरण क्रमांक - ४ संशोधन पध्दती) संशोधनासाठी वापरलेली पध्दती,
सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने याबाबत ऊहापोह केला आहे.

# संदर्भ

1) Whitney, F.L. - "Elements of Research" (New Yark, Prentice Hall Inc., 1954), P.P. 98 - 112.

2) मुळे, रा. शं., उमाठे, वि. तु., "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे", प्र. आ. १९७७ (नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,) पृ. ७१

3) Gefen, Raphael - "An Experiment with Cloze Testing" (E.L.T. 33.2, P.P. 122-126, 1979)

4) Wainman, H. - "Cloze Testing of Second Language Learners" (E.L.T. Journel, 33.2, P.P. 126-132, 1979)

5) Shastri, S. V., - "The Cloze Test As a Measure of Language Proficiency for India" (Journal of Shivaji University, Vol.- 19, 1980)

6) E.L.T.C. - Correspondance Course in Modern Technique of Testing and Evaluation, Unit - 5, "Testing Overall Language Ability, The Cloze Procedure", (E.L.T. Centre Shivaji University, Kolhapur), (Memographed 1988).